# श्री शिवलीलामृत अध्याय-११



www.anipdf.com

श्रीगणेशाय नमः ॥

धन्य धन्य तेचि जन । जे शिवभजनीं परायण ।
सदा शिवलीलामृत श्रवण । अर्चन सदा शिवाचे ॥ १ ॥
सूत म्हणे शौनकादिकांप्रति । जे रुद्राक्षधारण भस्म चर्चिती ।
त्यांच्या पुण्यास नाहीं मिती । त्रिजगतीं तेचि धन्य ॥ २ ॥
जोसहस्र रुद्राक्ष करी धारण । त्यासी वंदिती शक्रादि सुरगण ।
तो शंकरचि त्याचें दर्शन । घेतां तरती जीव बहु ॥ ३ ॥
अथवा षोडश षोडश दंडी जाण । बांधावे रुद्राक्ष सुलक्षण ।
शिखेमाजी एक बांधावा पूर्ण । शिवस्वरुप म्हणवुनी ॥ ४ ॥
त्यावरोनि करितां स्नान । तरी त्रिवेणी स्नान केल्यासमान ।
असो द्‍वादश द्‍वादश मनगटीं पूर्ण । रुद्राक्ष बांधिजे आदरे ॥ ५ ॥
कंठी बांधावे बत्तीस । मस्तकाभोंवते चोवीस ।
सहा सहा कर्णीं पुण्य विशेष । बांधितां निर्दोष सर्वदा ॥ ६ ॥
अष्टोत्तरशत माळ । सर्वदा असावी गळां ।
एकमुखी रुद्राक्ष आगळा । पूजितां भाग्य विशेष ॥ ७ ॥
पंचमुख षण्मुख अष्टमुख । चतुर्दशमुख लक्ष्मीकारक ।
सकळ मंत्र सुफळ देख । रुद्राक्षजप नित्य करितां ॥ ८ ॥
नित्य रुद्राक्षपूजन । तरी केलें जाणिजे शिवार्चन ।
रुद्राक्षमहिमा परम पावन । इतिहास ऐका येविषयीं ॥ ९ ॥

www.anipdf.com

काश्मीर देशींचा नृप पावन । नामाभिधान भद्रसेन ।
विवेकसंपन्न प्रधान । परम चतुर पंडित ॥ १० ॥
प्रजा दायाद भूसुर । धन्य म्हणती तोचि राजेश्वर ।
लांच न घे न्याय करी साचार । अमात्य थोर तोचि पैं ॥ ११ ॥
सुंदर पतिव्रता मृदुभाषिणी । पूर्वदत्तें ऐसी लाधिजे कामिनी ।
सुत सभाग्य विद्वान गुणी । विशेष सुकृतें पाविजे ॥ १२ ॥
गुरु कृपावंत सर्वज्ञ थोर । शिष्य प्रज्ञावंत गुरुभक्त उदार ।
वक्ता क्षमाशील शास्त्रज्ञ सुरस फार । विशेष सुकृतें लाहिजे ॥ १३ ॥
श्रोता सप्रेम चतुर सावधान । यजमान साक्षेपी उदार पूर्ण ।
काय आरोग्य सुंदर कुलीन । पूर्वसुकृतें प्राप्त होय ॥ १४ ॥
असो तो भद्रसेन आणि प्रधान । बहुत करितां अनुष्ठान ।
दोघांसी झाले नंदन । शिव भक्त उपजतांचि ॥ १५ ॥
राजपुत्र नाम सुधर्म । प्रधानात्मज तारक नाम ।
दोघे शिवभक्त निःसीम । सावधान शिवध्यानीं ॥ १६ ॥
बाळें होऊनि सदा प्रेमळ । अनुराग चित्तीं वैराग्यशीळ ।
लौकिकसंगे ध्रुव अमंगळ । त्यांची संगती नावडे त्यां ॥ १७ ॥
पंचवर्षी दोघे कुमर । लेवविती वस्त्रें अलंकार ।
गजमुक्तमाळा मनोहर । नाना प्रकारें लेवविती ॥ १८ ॥
तंव ते बाळ दोघेजण । सर्वालंकार उपाधी टाकून ।
करिती रुद्राक्ष धारण ।भस्म चर्चिती सर्वांगीं ॥ १९ ॥

www.anipdf.com

आवडे सर्वदा एकांत । श्रवण करिती शिवलीलामृत ।
बोलती शिवनामावळी सत्य । पाहाणें शिवपूजा सर्वदा ॥ २० ॥
आश्र्चर्य करिती राव प्रधान । यांसी कां नावडे वस्त्रभूषण ।
करिती रुद्राक्षभस्म धारण । सदा स्मरण शिवाचें ॥ २१ ॥
विभूति पुसोनि रुद्राक्ष काढिती । मागुती वस्त्रें भूषणें लेवविती ।
ते सवेंचि ब्राह्मणांसी अर्पिती । घेती मागुती शिवदीक्षा ॥ २२ ॥
शिक्षा करितां बहुत । परी ते न सांडिती आपुलें व्रत ।
राव प्रधान चिंताग्रस्त । म्हणती करावें काय आतां ॥ २३ ॥
तों उगवला सुकृतमित्र । घरासी आला पराशर ।
सवें वेष्टित ऋषींचे भार । अपर सूर्य तेजस्वी ॥ २४ ॥
जो कृष्णद्वैपायनाचा जनिता । त्रिकाळज्ञानी प्रतिसृष्टिकर्ता ।
जो वसिष्ठाचा नातू तत्त्वतां । राक्षससत्र जेणें केलें ॥ २५ ॥
जेवीं मनुष्यें वागती अपार । तैसेचि पूर्वीं होते रजनीचर ।
ते पितृकैवारें समग्र । जाळिले सत्र करुनियां ॥ २६ ॥
जनमेजयें सर्पसत्र केलें । तें आस्तिकें मध्येंचि राहविलें ।
पराशरासी पुलस्तीनें प्रार्थिलें । मग वांचले रावणादिक ॥ २७ ॥
विरंचीस दटावूनि क्षणमात्रें । प्रतिसृष्टि केली विश्र्वामित्रें ।
तेवीं पितृकैवारें पराशरें । वादी जर्जर पैं केले ॥ २८ ॥
ते सांगावी समूळ कथा । तरी विस्तार होईल ग्रंथा ।
यालागीं ध्वनितार्थ बोलिलों आतां । कळलें पाहिजे निर्धारें ॥ २९ ॥

www.anipdf.com

ऐसा महाराज पराशर । ज्याचा नातू होय शुक योगींद्र ।
तो भद्रासेनाचा कुळगुरु निर्धार । घरा आला जाणोनी ॥ ३० ॥
राव प्रधान सामोरे धांवती । साष्टांग नमूनि घरासी आणिती ।
षोडशोपचारीं पूजिती । भाव चित्तीं विशेष ॥ ३१ ॥
समस्तां वस्त्रें भूषणें देऊन । राव विनवी कर जोडून ।
म्हणे दोघे कुमर रात्रंदिन । ध्यान करिती शिवाचें ॥ ३२ ॥
नाचडती वस्त्रें अलंकार । रुद्राक्षभस्मावरी सदा भर ।
वैराग्याशील अणुमात्र । भाषण न करिती कोणासीं ॥ ३३ ॥
इंद्रियभोगावरी नाहीं भर । नावडे राजविलास अणुमात्र ।
गजवाजियानीं समग्र । आरुढावें आवडेना ॥ ३४ ॥
पुढें हे कैसें राज्य करिती । हें आम्हांसी गूढ पडलें चित्तीं ।
मग ते दोघे कुमर आणोनि गुरुप्रती । दाखविले भद्रसेनें ॥ ३५ ॥
गुरुनें पाहिलें दृष्टीसीं । जैसे मित्र आणि शशी ।
तैसे तेजस्वी उपमा तयांसी । नाहीं कोठें शोदहितां ॥ ३६ ॥
यावरी बोले शक्तिसुत । म्हणे हे कां झाले शिवभक्त ।
यांची पूर्वकथा समस्त । ऐक तुज सांगतो ॥ ३७ ॥
पूर्वी काश्मीर देशांत उत्तम । महापट्टण नंदिग्राम ।
तेथील वारांगना मनोरम । महानंदा नाम तियेचें ॥ ३८ ॥
त्या ग्रामींचा तोचि भूप । पृथ्वीमाजी निःसीम स्वरुप ।
ललिताकृति पाहोनि कंदर्प । तन्मय होवोनि नृत्य करी ॥ ३९ ॥

www.anipdf.com

जैसा उगवला पूर्णचंद्र । तैसें तिजवरी विराजे छत्र ।
रत्नखचित यानें अपार । भाग्या पार नाहीं तिच्या ॥ ४० ॥
रत्नमय दंडयुक्त । चामरें जीवरी सदा ढळत ।
मणिमय पादुका रत्नखचित । चरणीं जिच्या सर्वदा ॥ ४१ ॥
विचित्र वसनें दिव्य सुवास । हिरण्मय रत्नपर्यंतक राजस ।
चंद्ररश्मिसम प्रकाश । शय्या जिची अभिनव ॥ ४२ ॥
दिव्याभरणीं संयुक्त । अंगीं सुगंध विराजित ।
गोमहिषीखिल्लारें बहुत । वाजी गज घरीं बहुवस ॥ ४३ ॥
दास दासी अपार । घरीं माता सभाग्य सहोदर ।
जिचें गायन ऐकतां किन्नर । तटस्थ होती कोकिळा ॥ ४४ ॥
जिच्या नृत्याचें कौशल्य देखोन । सकळ नृप डोलविती मान ।
तिचा भोगकाम इच्छून । भूप सभाग्य येती घरा ॥ ४५ ॥
वेश्या असोनि पतिव्रता । नेमिला जो पुरुष तत्त्वतां ।
त्याचा दिवस न सरतां । इंद्रासही वश्य नव्हे ॥ ४६ ॥
परम शिवभक्त विख्यात । दानशील उदार बहुत ।
सोमवार प्रदोषव्रत । शिवरात्र करी नेमेंसीं ॥ ४७ ॥
अन्नछत्र सदा चालवीत । नित्य लक्षत्रिदळें शिव पूजित ।
ब्राह्मणहस्तें अद्भत । अभिषेक करवी शिवासी ॥ ४८ ॥
याचक मनीं जें जें इच्छीत । तें तें महानंदा पुरवीत ।
कोटि लिंगें करवीत । श्रावणमासीं अत्यादरें ॥ ४९ ॥

www.anipdf.com

ऐकभद्रसेना सावधान । कुक्कुट मर्कट पाळिले प्रीतीकरुन ।
त्यांच्या गळां रुद्राक्ष बांधोन । नाचूं शिकविलें कौतुकें ॥ ५० ॥
आपुलें जें कां नृत्यागार । तेथें शिवलिंग स्थापिलें सुंदर ।
कुक्कुट मर्कट त्यासमोर । तेथेंचि बांधी प्रीतीनें ॥ ५१ ॥
करी शिवलीलामृतपुराणश्रवण । तेंही ऐकती दोघेजण ।
सवेंचि महानंदा करी गायन । नृत्य करी शिवापुढें ॥ ५२ ॥
महानंदा त्यांसी सोडून । नृत्य करवी कौतुकेंकरुन ।
त्यांच्या गळां कपाळीं जाण । विभूति चर्ची स्वहस्तें ॥ ५३ ॥
एवं तिच्या संगतीवरुन । त्यांसही घडतसे शिवभजन ।
असो तिचें सत्त्व पाहावया लागोन । सदाशिव पातला ॥ ५४ ॥
सौदागराचा वेष धरिला । महानंदेच्या सदना आला ।
त्याचें स्वरुप देखोनि ते अबला । तन्मय झाली तेधवां ॥ ५५ ॥
पूजा करोनि स्वहस्तकीं । त्यासी बैसविलें रत्नमंचकीं ।
तों पृथ्वीमोलाचें हस्तकीं । कंकण त्याच्या देखिलें ॥ ५६ ॥
देखतां गेली तन्मय होऊन । म्हणे स्वर्गींची वस्तु वाटे पूर्ण ।
विश्र्वकर्म्यानें निर्मिली जाण । मानंवी कर्तृत्व हें नव्हे॥ ५७ ॥
सौदागरें तें काढून । तिच्या हस्तकीं घातलें कंकण ।
येरी होवोनि आनंदघन । नेम करी तयासी ॥ ५८ ॥
पृथ्वीचें मोल हें कंकण । मीहि बत्तीस लक्षणी पद्मिण ।
तीन दिवस संपूर्ण । दासी तुमची झालें मी ॥ ५९ ॥

www.anipdf.com

तयासी तें मानलें । सर्वेचि त्यानें दिव्यलिंग काढलें ।
सूर्यप्रभेहूनि आगळें । तेज वर्णिलें नवजाय ॥ ६० ॥
लिंग देखोनि ते वेळीं । महानंदा तन्मय झाली ।
म्हणे जय जय चंद्रमौळी । म्हणोनि वंदी लिंगातें ॥ ६१ ॥
म्हणे या लिंगाच्या प्रभेवरुनी । कोटी कंकणें टाकावी ओवाळूनी ।
सौदागर म्हणे महानंदेलागूनी । लिंग ठेवी जतन हें ॥ ६२ ॥
म्हणे या लिंगापाशीं माझा प्राण । भंगलें कीं गेलें दग्ध होऊन ।
तरी मी अग्निप्रवेश करीन । महाकठीण व्रत माझें ॥ ६३ ॥
येरीनें अवश्य म्हणोन । ठेविलें नृत्यगारीं नेऊन ।
मग दोघे करिती शयन । रत्नखचित मंचकीं ॥ ६४ ॥
तिचें कैसें आहे सत्त्व । धैर्य पाहे सदाशिव ।
भक्त तारावया अभिनव । कौतुकचरित्र दाखवी ॥ ६५ ॥
त्याच्या आज्ञेकरुन । नृत्यशाळेसी लागला अग्न ।
जन धांवों लागले चहूंकडोन । एकचि हांक जाहली ॥ ६६ ॥
तीस सावध करी मदनारी । म्हणे अग्नि लागला ऊठ लवकरी ।
येरी उठली घाबरी । तंव वातात्मज चेतला ॥ ६७ ॥
तैशामाजी उडी घालून । कंठपाश त्यांचे काढून ।
कुक्कुट मर्कट दिधले सोडून । गेले पळोन वनाप्रती ॥ ६८ ॥
नृत्यशाळा भस्म झाली समग्र । मग शांत झाला सप्तकर ।
यावरी पुसे सौदागर । महानंदेप्रति तेधवां ॥ ६९ ॥

www.anipdf.com

माझें दिव्यलिंग आहे कीं जतन । महानंदा घाबरी ऐकोन ।
वक्षःस्थळ घेत बडवून । म्हणे दिव्यलिंग दग्ध झालें ॥ ७० ॥
सौदागर बोले वचन । नेमाचा आजि दुसरा दिन ।
मी आपुला देतों प्राण । लिंगाकारणें तुजवरी ॥ ७१ ॥
मग त्रिचरण चेतविला । आकाशपंथें जाती ज्वाळा ।
सौदागर सिद्ध झाला । समीप आला कुंडाच्या ॥ ७२ ॥
अतिलाघवी उमारंग । जो भक्तजनभवभंग ।
उडी घातली सुवेग । ॐ नमः शिवाय म्हणवुनी ॥ ७३ ॥
ऐसें देखतां महानंदा । बोलाविलें सर्व ब्रह्मवृंदा ।
लुटविली सर्व संपदा । कोशसमवेत सर्वही ॥ ७४ ॥
अश्र्वशाळा गजशाळा संपूर्ण । सर्व संपत्तिसहित करी गृहदान ।
महानंदेनें स्नान करुन । भस्म अंगीं चर्चिलें ॥ ७५ ॥
रुद्राक्ष सर्वांगी लेऊन । हृदयीं चिंतिलें शिवध्यान ।
हर हर शिव म्हणवुन । उडी निःशंक घातली ॥ ७६ ॥
सूर्यबिंब निघे उदयाचळीं । तैसा प्रगटला कपाळमौळी ।
दशभुज पंचवदन चंद्रमौळी । संकटीं पाळी भक्तांतें ॥ ७७ ॥
माथां जटांचा भार । तृतीयनेत्रीं वैश्र्वानर ।
शिरी झुळझुळ वाहे नीर । भयंकर महाजोगी ॥ ७८ ॥
चंद्रकळा तयाचे शिरीं । नीळकंठ खट्वांगधारी ।
भस्म चर्चिलें शरीरीं । जगचर्म पांघुरला ॥ ७९ ॥

www.anipdf.com

नेसलासे व्याघ्रांबर । गळां मनुष्यमुंडांचें हार ।
सर्वांग वेष्टित फणिवर । दशभुजा मिरवती ॥ ८० ॥
वरचेवरी कंदुक झेलीत । तेवीं दहाभुजा पसरोनी अकस्मात ।
महानंदेसी झेलूनि  धरीत । हृदयकमळीं परमात्मा ॥ ८१ ॥
म्हणें जाहलों मी सुप्रसन्न । महानंदे माग वरदान ।
ती म्हणे हे नगर उद्धरुन । विमानीं बैसवीं दयाळा ॥ ८२ ॥
माताबंधूंसमवेत । महानंदा विमानीं बैसत ।
दिव्यरुप पावोनि त्वरित । नगरासमवेत चालली ॥ ८३ ॥
पावलीं सकळ शिवपदीं । जेथें नाहीं आधिव्याधी ।
क्षुधातृषाविरहित त्रिशुद्धी । भेदबुद्धि कैंची तेथें ॥ ८४ ॥
नाहीं काम क्रोध द्वंद्व दुःख । मद मत्सर नाहीं निःशंक ।
जेथींचें गोड उदक । अमृताहूनि कोटिगुणें ॥ ८५ ॥
जेथें सुरतरुंचीं वनें अपारें । सुरभींचीं बहुत खिल्लारें ।
चिंतामणींचीं धवलागारें । भक्तांकारणें निर्मिलीं ॥ ८६ ॥
जेथें वोसणतां बोलती शिवदास । तें तें मास होय तयांस ।
शिवपद सर्वदा अविनाश । महानंदा तेथें पावली ॥ ८७ ॥
हे कथापरम सुरस । पराशर सांगे भद्रसेनास ।
म्हणे हे कुमर दोघे निःशेष । कुक्कुट मर्कट पूर्वींचे ॥ ८८ ॥
कंठीं रुद्राक्षधारण । भाळीं विभूति चर्चून ।
त्याचि पूर्वपुण्येंकरुन । सुधर्म तारक उपजले ॥ ८९ ॥

www.anipdf.com

हे पुढें राज्य करतील निर्दोष । बत्तीसलक्षणीं डोळस ।
शिवभजनीं लाविती बहुतांस । उद्धरितील तुम्हांतें ॥ ९० ॥
अमात्यसहित भद्रसेन । गुरुसी घाली लोटांगण ।
म्हणे इतुकेन मी धन्य । सुपुत्र उदरीं जन्मले ॥ ९१ ॥
भद्रसेन बोलत पुढती । हे राज्य किती वर्षें करिती ।
आयुष्याप्रमाण किती । सांगा यथार्थ गुरुवर्या ॥ ९२ ॥
बहुत करितां नवस । एवढाचि पुत्र आम्हांस ।
परम प्रियकर राजस । प्राणांहूनि आवडे बहु ॥ ९३ ॥
तुमच्या आगमनेंकरुन । स्वामी मज समाधान ।
तरी या पुत्रांचें आयुष्यप्रमाण । सांगा स्वामी मज तत्त्वतां ॥ ९४ ॥
ऋषि मी सत्य बोलेन देख । परी तुम्हांसी ऐकता वाटेल दुःख ।
हे सभा सकळीक । दुःखार्णवीं पडेल पैं ॥ ९५ ॥
प्रत्ययसदृश बोलावें वचन । ना तरी आंगास येतें मूर्खपण ।
तुम्हां वाटेल विषाहून । विशेष ऐसी ते गोष्टी ॥ ९६ ॥
भद्रसेन म्हणे सत्य वचन । बोलावया न करावा अनमान ।
तरी तुझ्या पुत्रासी बारा वर्षें पूर्ण । झालीं असतां जाणपां ॥ ९७ ॥
आजपासोनि सातवे दिवशीं । मृत्यु पावेल या समयासी ।
राव ऐकतां धरणीसी । मूर्छा येऊनि पडियेला ॥ ९८ ॥
अमात्यासहित त्या स्थानीं । दुःखाग्नींत गेले आहाळोनी ।
अंतःपुरीं सकळ कामिनी । आकांत करिती आक्रोशें ॥ ९९ ॥

www.anipdf.com

करुनियां हाहाकार । वक्षःस्थळ पिटी नृपवर ।
मग रायासी पराशर । सावध करोनि गोष्ट सांगे ॥ १०० ॥
नृपश्रेष्ठा न सोडीं धीर । ऐक एक सांगतों विचार ।
जें पंचभूतें नव्हतीं समग्र । शशिमित्र नव्हते तैं ॥ १०१ ॥
नव्हता मायामय विकार । केवळ ब्रह्ममय साचार ।
तेथें झालें स्फुरणजागर । अहं ब्रह्म म्हणोनियां ॥ १०२ ॥
तें ध्वनि माया सत्य । तेथोनि जाहलें महत्तत्त्व ।
मगत्रिविध अहंकार होत । शिवइच्छेंकरुनियां ॥ १०३ ॥
सत्त्वांशें निर्मिला पीतवसन । रजांशें सृष्टिकर्ता द्रुहिण ।
तमांशें रुद्र परिपूर्ण । सर्गस्थित्यंत करविता ॥ १०४ ॥
विधीसी म्हणे सृष्टि रचीं पूर्ण । येरु म्हणे मज नाहीं ज्ञान ।
मग शिवें तयालागून । चारी वेद उपदेशिले ॥ १०५ ॥
चहूं वेदांचें सार पूर्ण । तो हा रुद्राध्याय परम पावन ।
त्याहूनि विशेष गुह्य ज्ञान । भुवनत्रयीं असेना ॥ १०६ ॥
बहुत करीं हा जतन । त्याहूनि आणिक थोर नाहीं साधन ।
हा रुद्राध्याय शिवरुप म्हणून । श्रीशंकर स्वयें बोले ॥ १०७ ॥
जे रुद्राध्याय ऐकती पढती । त्यांच्या दर्शनें जीव उद्धरती ।
मग कमलोद्भव एकांतीं । सप्तपुत्रां सांगे रुद्र हा ॥ १०८ ॥
मग सांप्रदायें ऋषीपासोन । भूतलीं आला अध्याय जाण ।
थोर जप तप ज्ञान । त्याहूनि अन्य नसेचि ॥ १०९ ॥

www.anipdf.com

जो हा अध्याय जपे संपूर्ण । त्याचेनि दर्शनें तीर्थें पावन ।
स्वर्गींचे देव दर्शन । त्याचे घेऊं इच्छिती ॥ ११० ॥
जप तप शिवार्चन । याहूनि थोर नाहीं जाण ।
रुद्रमहिमा अगाध पूर्ण । किती म्हणोनि वर्णावा ॥ १११ ॥
रुद्रमहिमा वाढला फार । ओस पडिलें भानुपुत्रनगर ।
पाश सोडोनि यमकिंकर । रिते हिंडो लागले ॥ ११२ ॥
मग यमें विधिलागी पुसोन । अभक्तिकृत्या निर्मिली दारुण ।
तिणें कुतर्कवादी भेदी लक्षून । त्यांच्या हृदयीं संचरली ॥ ११३ ॥
त्यांसी मत्सर वाढविला विशेष । वाटे करावा शिवद्वेष ।
तेणें ते जावोनि यमपुरीस । महानरकीं पडलें सदा ॥ ११४ ॥
यम सांगे दूतांप्रती । शिवद्वेषी जेपापमती ।
ते अल्पायुषी होती । नाना रीतीं जाचणी करा ॥ ११५ ॥
शिव थोत विष्णु लहान । हरि विशेष हर गौण ।
ऐसें म्हणतीजे त्यालागून । आणोनि नरकीं घालावे ॥ ११६ ॥
रुद्राध्याय नावडे ज्यांसी । कुंभीपाकीं घालावें त्यांसी ।
रुद्रानुष्ठानें आयुष्यासी । वृद्धि होय निर्धारें ॥ ११७ ॥
याकरितां भद्रसेना अवधारीं । अयुत रुद्रावर्तनें करीं ।
शिवावरी अभिषेकधार धरीं । मृत्यु दूरी होय साच ॥ ११८ ॥
अथवा शतघट स्थापून । दिव्यवृक्षांचे पल्लव आणून ।
रुद्रें उदक अभिमंत्रून । अभिषिंचन पुत्रा करीं ॥ ११९ ॥

www.anipdf.com

नित्य दहा सहस्र आवर्तनें पूर्ण । क्षोणीपाळा करीं सप्तदिन ।
रायें धरिलें दृढ चरण । सद्गद होवोनि बोलत ॥ १२० ॥
सकळऋषिरत्नमंडितपदक । स्वामी तूं त्यांत मुख्य नायक ।
काळ मृत्यु भय शोक । गुरु रक्षी त्यांपासूनि ॥ १२१ ॥
तरी त्वां आचार्यत्व करावें पूर्ण । तुजसवें जे आहेत ब्राह्मण ।
आणीक सांगती ते बोलावून । आतांचि आणितों आरंभी ॥ १२२ ॥
मग सहस्र विप्र बोलावून । ज्यांची रुद्रानुष्ठानीं भक्ति पूर्ण ।
न्यासध्यानयुक्त पढून । गुरुपासून जे आले ॥ १२३ ॥
परदारा आणि परधन । ज्यांसी वमनाहूनि नीच पूर्ण ।
विरक्त सुशील गेलिया प्राण । दुष्ट प्रतिग्रह न घेती ॥ १२४ ॥
जे शापानुग्रहसमर्थ । सामर्थ्यें चालों न देती मित्ररथ ।
किंवा साक्षात उमानाथ । पुढें आणोनि उभा करिती ॥ १२५ ॥
ऐसे लक्षणयुक्त ब्राह्मण । बैसला व्यासपिता घेऊन ।
सहस्र घट मांडून । अभिमंत्रोनि स्थापिले ॥ १२६ ॥
स्वर्धुनीचें सलिल भरलें पूर्ण । त्यांत आम्रपल्लव घालून ।
रुद्रघोषें गर्जिन्नले ब्राह्मण । अनुष्ठान दिव्य मांडिलें ॥ १२७ ॥
शास्त्रसंख्या झाले दिवस । सातवे दिवशीं मध्यान्हीं आला चंडांश ।
मृत्युसमय येतां धरणीस । बाळ मूर्छित पडियेला ॥ १२८ ॥
एक मूहूर्त निचेष्टित । चलनवलन राहिलें समस्त ।
परम घाबरला नृपनाथ । गुरु देत नाभीकारा ॥ १२९ ॥

www.anipdf.com

रुद्रोदक शिंपून । सावध केला राजनंदन ।
त्यासी पुसती वर्तमान । वर्तलें तेंचि सांगत ॥ १३० ॥
एक काळपुरुष भयानक थोर । ऊर्ध्व जटा कपाळीं शेंदूर ।
विक्राळ दाढा भयंकर । नेत्र खदिरांगारासारखें ॥ १३१ ॥
तो मज घेऊनि जात असतां । चौघे पुरुष धांवोनि आले तत्त्वतां ।
पंचवदन दशभुज त्यांची साम्यता । कमळ भवांडीं दुजी नसे ॥ १३२ ॥
ते तेजें जैसे गभस्ती । दिगंततम संहारिती ।
भस्म अंगीं व्याघ्रांबर दिसती । दश हस्तीं आयुधें ॥ १३३ ॥
ते महाराज येऊन । मज सोडविलें तोडोनि बंधन ।
त्या काळपुरुषासी धरुन । करीत ताडन गेले ते ॥ १३४ ॥
ऐसें पुत्रमुखींचें ऐकतां उत्तर । भद्रसेन करी जयजयकार ।
ब्राह्मणांसी घाली नमस्कार । आनंदाश्रु नेत्रीं आले ॥ १३५ ॥
अंगीं रोमांच दाटले । मग विप्र चरणीं गडबडां लोळे ।
शिवनाम गर्जत तये वेळे । देव सुमनें वर्षती ॥ १३६ ॥
अनेक वाद्यांचे गजर । डंका गर्जे अवघ्यांत थोर ।
मुखद्वयांची महासुस्वर । मृदंगवाद्यें गर्जती ॥ १३७ ॥
अनेक वाद्यांचे गजर । शिवलीला गाती अपार ।
श्रृंगेंभृंगे काहाळ थोर । सनया अपार वाजती ॥ १३८ ॥
चंद्रानना धडकत भेरी । नाद न माये नभोदरीं ।
असो भद्सेन यावरी । विधियुक्त होम करीतसे ॥ १३९ ॥

www.anipdf.com

षड्रस अन्नें शोभिवंत । अलंकार दिव्य वस्त्रें देत ।
अमोलिक वस्तु अद्भुत । आणोनि अर्पी ब्राह्मणांसी ॥ १४० ॥
दक्षिणेलागी भांडारें । मुक्त केली राजेंद्रें ।
म्हणे आवडे तितुके भरा एकसरें । मागें पुढें पाहूं नका ॥ १४१ ॥
सर्व याचक केले तृप्त । पुरे पुरे हेचि ऐकिली मात ।
धनभार झाला बहुत । म्हणोनि सांडिती ठायीं ठायीं ॥ १४२ ॥
ब्राह्मण देती मंत्राक्षता । विजय कल्याण हो तुझिया सुता ।
ऐसा अति आनंद होत असतां । तों अद्भुत वर्तलें ॥ १४३ ॥
वसंत येत सुगंधवनीं । कीं काशीक्षेत्रावरी स्वर्धुनी ।
कीं श्र्वेतोत्पलें मृडानी । रमण लिंग अर्चिलें ॥ १४४ ॥
कीं निर्दैवासी सांपडे चिंतामणी । कीं क्षुधितापुढें क्षीराब्धि ये धांवूनी ।
तैसा कमलोद्भवनंदन ते क्षणीं । नारदमुनी पातला ॥ १४५ ॥
वाल्मीक सत्यवतीनंदन । औत्तान पादीकयाधुहृददयरत्न ।
हे शिष्य ज्याचे त्रिभुवनीं जाण । वंद्य जे कां सर्वांतें ॥ १४६ ॥
जो चतुःष्ठिकळाप्रवीण  निर्मळ । चतुर्दशविद्या करतळामळ ।
ज्याचें स्वरुप पाहतां केवळ । नारायण दुसरा कीं ॥ १४७ ॥
हें कमळभवांड मोडोनी । पुनः सृष्टि करणार मागुतेनी ।
अन्याय विलोकितां नगनीं । दंडें ताडील शक्रादिकां ॥ १४८ ॥
तों नारद देखोनि तेचि क्षणीं । कुंडांतूनि मूर्तिमंत निघे अग्नी ।
दक्षिणाग्नि गार्हपत्य आहवनी । उभे ठाकले देखतां ॥ १४९ ॥

www.anipdf.com

पराशरादि सकळ ब्राह्मण । प्रधानासहित भद्रसेन ।
धांवोनि धरिती चरण । ब्रह्मानंदें उचंबळले ॥ १५० ॥
दिव्य गंध दिव्य सुमनीं । षोडशोपचारें पूजिला नारदमुनी ।
राव उभा ठाकें कर जोडोनी । म्हणे स्वामी अंर्तीदिव्यद्रष्टा तूं ॥ १५१ ॥
त्रिभुवनीं गमन तुझें सर्व । कांहीं देखिलें सां अपूर्व ।
नारद म्हणे मार्गी येतां शिव- । दूत चौघे देखिले ॥ १५२ ॥
दशभुज पंचवदन । तिहीं मृत्यु नेला बांधोन ।
तुझ्या पुत्राचें चुकविलें मरण । रुद्रानुष्ठानें धन्य केलें ॥ १५३ ॥
तव पुत्ररक्षणार्थ ते वेळां । शिवें वीरभद्र मुख्य पाठविला ।
मज देखतां मृत्युसी पुसूं लागला । शिवसुत ऐका तें ॥ १५४ ॥
तूं कोणाच्या आज्ञेवरुन । आणीत होतासी भद्रसेननंदन ।
त्यासी दहा सहस्र वर्षें पूर्ण । आयुष्य असे निश्र्चयें ॥ १५५ ॥
तो सार्वभौम होईल तत्त्वतां । रुद्रमहिमा तुज ठाऊक असतां ।
शिवमर्यादा उल्लंघूनि तत्त्वतां । कैसा आणीत होतासी ॥ १५६ ॥
मग चित्रगुप्ता पुसे सूर्यनंदन । पत्रिका पाहिली वाचून ।
तव द्वादशवर्षी मृत्युचिन्ह । गंडांतर थोर होतें ॥ १५७ ॥
तें महत्पुण्यें निरसूनि सहज । दहा सहस्र वर्षें करावें राज्य ।
मग तो सूर्यनंदन महाराज । स्वापराधें कष्टीं बहू ॥ १५८ ॥
मग उभा ठाकूनि कृतांत । कर जोडोनि स्तवन करीत ।
हे अपर्णाधव हिमनगजामात । अपराध न कळतां घडला हा ॥ १५९ ॥

www.anipdf.com

ऐसें नारदें सांगतां ते क्षणीं । रायें पायांवरी घातली लोळणी ।
आणीक सहस्र रुद्र करुनी । महोत्साह करीतसे ॥ १६० ॥
शतरुद्र करितां निःशेष । शतायुषी होय तो पुरुष ।
हा अध्याय पढतां निर्दोष । तो शिवरुप याचि देहीं ॥ १६१ ॥
तो येथेंचि झाला मुक्त । त्याच्या तीर्थें तरती बहुत ।
असो यावरी ब्रह्मसुत । अंतर्धान पावला ॥ १६२ ॥
आनंदमय शक्तिनंदन । रायें शतपद्म धन देऊन ।
तोषविला गुरु संपूर्ण । ऋषिंसहित जाता झाला ॥ १६३ ॥
हें भद्रसेन आख्यान जें पढती । त्यांसी होय आयुष्य संतती ।
त्यांसी काळ न बाधे अंतीं । वंदोनि नेती शिवपदा ॥ १६४ ॥
दशशत कपिलादन । ऐकतां पडतां घडे पुण्य ।
केलें असेल अभक्ष्यभक्षण । सुरापान ब्रह्महत्या ॥ १६५ ॥
एवं महापापपर्वत तत्त्वतां । भस्म होती श्रवण करितां ।
हा अध्याय त्रिकाळ वाचितां । गंडांतरें दूर होती ॥ १६६ ॥
यावरी कलियुगीं निःशेष । शिवकीर्तनाचा महिमा विशेष ।
आयुष्यहीन लोकांस । अनुष्ठान हेंचि निर्धारें ॥ १६७ ॥
मग तो राव भद्रसेन । सुधर्म पुत्रासी राज्य देऊन ।
युवराज्य तारकालागून । देता झाला ते काळीं ॥ १६८ ॥
मग प्रधानासमवेत राव जाणा । जाता झाला तपोवना ।
शिवअनुष्ठान रुद्राध्याना । करितां महारुद्र तोषला ॥ १६९ ॥

www.anipdf.com

विमानीं बैसवूनि त्वरित । राव प्रधान नेलें मिरवित ।
विधिलोकीं वैकुंठीं वास बहुत । स्वेच्छेंकरुनि राहिले ॥ १७० ॥
शेवटीं शिवपदासी पावून । राहिले शिवरुप होऊन ।
हा अकरावा अध्यय जाण । स्वरुप एकादश रुद्रांचें ॥ १७१ ॥
हा अध्याय करितां श्रवण । एकादश रुद्रां समाधान ।
कीं हा कल्पद्रुम संपूर्ण । इच्छिलें फळ देणार ॥ १७२ ॥
मृत्युंजयजप रुद्रानुष्ठान । त्यासी न बाधी ग्रहपीडा विघ्न ।
पिशाचबाधा रोग दारुण । न बाधीच सर्वथाही ॥ १७३ ॥
येथें जो मानील अविश्र्वास । तो होईल अल्पायुषी तामस ।
हें निंदी तो चांडाळ निःशेष । त्याचा विटाळ न व्हावा ॥ १७४ ॥
त्यासी प्रसवोनि वांझ झाली माता । त्याची संगती न धरावी तत्त्वतां ।
त्यासी संभाषण करितां । महापातक जाणिजे ॥ १७५ ॥
ते आपुल्या गृहासी न आणावे । आपण त्यांच्या सदनासी न जावें ।
ते त्यजावे जीवेंभावें । जेवीं सुशील हिंसकगृह ॥ १७६ ॥
जो प्रत्यक्ष भक्षितो विष । जे मूर्ख बैसती त्याचे पंक्तीस ।
त्यांसी मृत्यु आला या गोष्टीस । संदेह कांहीं असेना ॥ १७७ ॥
असों सर्वभावें निश्र्चित । अखंड पहावें शिवलीलामृत ।
हें न तरी त्वरित । हा अध्याय तरी वाचावा ॥ १७८ ॥
या अध्यायाचें करितां अनुष्ठान । तयासी नित्य रुद्र केल्याचें पुण्य ।
त्याचे घरीं अनुदिन । ब्रह्मानंद प्रगटेल ॥ १७९ ॥

www.anipdf.com

अपर्णाहृदयाब्जमिलिंद । श्रीधरस्वामी तो ब्रह्मानंद ।
जो जगदानंदमूळकंद । अभंग न विटे कालत्रयीं ॥ १८० ॥
शिवलीलामृत ग्रंथ प्रचंड । स्कंदपुराण ब्रह्मोत्तरखंड ।
परिसोत सज्जन अखंड । एकादशाध्याय गोड हा ॥ १८१ ॥

www.anipdf.com